पोयनाड पोलीस ठाणे गु र क्र 92/17 U/S 379 हकीकत-

या गुन्ह्यातील फिर्यादी पुष्पां पाटील ह्या पोयनाड बस स्टॅन्ड येथून बस मध्ये बसून अलिबाग येथे जात असताना तिकीट काढण्यासाठी पर्स मध्ये हात घातला असता त्यांना पर्स चोरी झाल्याचे निदर्शनास आले,त्या लगेच पेझारी नाका येथे उतरल्या व आपल्या पतीस फोन करून हकीकत सांगून त्यांच्या मदतीने पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याकरिता आल्या . पो ठाणे अंमलदार रॉड्रीग्स यांनी तक्रार ऐकून ,घटनेचे गांभिर्य ओळखून तात्काळ पोयनाड नाका येथे येऊन cctv फुटेज चेक केले ,त्यावेळी संशयित 3 महिला फिर्यादी यांच्या बरोबर बस मध्ये चढताना दिसून आल्या ,तसेच त्या तीन महिला त्या अगोदर मुंबई कडून येणाऱ्या बस मधून पोयनाड बस स्टॅन्ड वर उतरताना दिसत होत्या ,महिलांच्या वर्ण नावरून अंमलदार यांनी अलिबाग कडून येणाऱ्या वाहन चालकांना संबंधित महिलांचे वर्णन सांगून ,नमूद वर्णनाच्या महिला रस्त्यामध्ये कुठे दिसल्या किंवा कसे याबाबत विचारपूस चालू असताना एका वाहन चालकाकडून नमूद वर्णनाच्या महिला कार्लेखिंड या ठिकाणी दिसल्याचे सांगितले ,लगेच एका पोलीस कर्मचाऱ्याला सोबत घेऊन पो ना रॉड्रीग्स खासगी वाहनाने अलिबागकडे रवाना झाले .कारलेखिड च्या पुढे झाडाखाली नमूद वर्णनाच्या महीला दिसून आल्याने त्यांनी महिला पोलीस कर्मचाऱ्याला मदतीला बोलावून संबंधित संशयित महिलांना पोलीस ठाण्यात घेऊन आले.तो पर्यंत आम्ही व सपोनि बुऱ्हाडे पोलीस ठाण्यात पोहचलो .महिला पंचांना समक्ष संबंधित महिलांच्या झडतीत फिर्यादी यांचा चोरीस गेलेला एकूण 47250 रु चा मुद्देमाल तीनही महिलांच्या अंगझडतीत मिळून आला . अटक महिलांची नावे

1)शकुंतला लिलाप्पा खुंटे वय 34

2)मधू नरेश खुंटे वय 35

3)ज्योती शिवकुमार खुंटे वय 22

सर्व रा.हाय वे ब्रिजच्या खाली बोरिवली, मुंबई.

उघडकीस आलेले गुन्हे-

1)पोयनाड cr no-16/16 u/s 379

2)पोयनाड cr no -68/16 u/s 379

3)पोयनाड cr no -77/16 u/s 379.



